REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २० डिसेंबर, १९४४ अंक ५०




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

हालचालयुक्त व चित्ताकर्षक
**चित्रकला प्रदर्शन**
आर्यन सिनेमाजवळ, पुणें शहर
वेळः—३॥ ते रात्रौ १० वाजेपर्यंत

**सुपर फॉस्फेट**

एका खतां पोटी । दाणे कोटी कोटी ॥
सोनें कनवटीं । किसानाच्या ॥

यंदा : आनंदराव पाटील आनंदांत होते. कारण, पडीत उपळलेलीं जमीन सुपीक झाली. जमिनीचा पोत सुधारून पीक भरपूर आलें. रिकाम्या पोत्यांत दाणे आले.

यंदा : लहानुनें लक्ष्मीचें लग्न ठरविलें, कारण त्याची मुसंब्याचीं झाडें चांगलीं पोसलीं. बाग फळानें बहरली. फळें रसदार झालीं. पैसा भरदार आला.

यंदा : संडूजी खुषीत होता. कारण शेतांतील ऊस चांगला पोसला. उसाचें पाणी पुष्कळ पडलें. गूळ कित्येक पट्टे अधिक आला.

पण

यंदा : सावकार नानासाहेब नाखुष होते. कारण सावकारीची सद्दी संपली.

हें झालें कशानें !
**सुपर फॉस्फेट वापरल्यानें**

आय. ए. सी. आय. लि.,
कर्वे रोड, पुणें ४.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**
स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

—शाखा—
**डेकन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर**

—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

**विक्रीस काढलेल्या नवीन दहा लाख रुपयांच्या भागांस फारच जास्त मागणी आली.**

विशेष माहितीसाठी लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## विविध माहिती

### विंचुरकर आणि कंपनी

मेसर्स विंचुरकर आणि कंपनी ह्या नावानें मिरज ज्युनिअर संस्थानांत व्यवहार करीत असलेल्या फर्मच्या तीन भागीदारांपैकी श्री. व्ही. आर. मडकमकर हे फर्ममधून निवृत्त झाले आहेत आणि फर्ममध्यें आतां सरदार के. आर. विंचुरकर व सरदार व्ही. डी. पानसे हे दोघे राहिले आहेत.

### विजेचें कार्यक्षम उत्पादन

ग्रेट ब्रिटनमध्यें वीज उत्पादन करण्यास १८८८ सालीं विद्युत्गृहांना प्रत्येक युनिटमागें १२ शेर कोळसा लागे; आतां अर्धा शेर कोळशांत तेवढीच वीज निर्माण करतां येते.

### सोलापूर स्पिनिंग अँड वीव्हिंग कं. लि.

वरील कंपनीचें वसूल भांडवल ३२ लक्ष रुपये आहे. रिझर्व्ह व इतर फंडांत सुमारें १॥ कोटि रुपये आहेत. ३१ मार्च १९४४ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीस ६९ लक्ष रुपये नफा झाला. कंपनीच्या प्रत्येक १,००० रुपयांच्या भागास ४०० रुपये डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीच्या प्रत्येक भागाची ५० रुपयांच्या २० भागांत विभागणी करण्यांत यावी, अशी कांहीं भागीदारांची सूचना आहे, त्यावर डायरेक्टरांनीं मतें मागविलीं आहेत.

### कोयनेल

कोयनेल हें मलेरियावरील जालीम औषध सिंकोना झाडाच्या सालीपासून तयार करतात. १६३८सालीं पेरुच्या स्पॅनिश गव्हर्नरची पत्नी कौंटेस ऑफ सिंकोना, हिचा हिंवताप एका झाडाच्या सालीच्या व्यवनामुळें बरा झाला, तेव्हांपासून त्या झाडास सिंकोना हें नांव मिळालें. ह्या औषधाची कीर्ति युरोपभर पसरली व त्यास मागणी वाढली. दक्षिण अमेरिकेंतून त्याची निर्गत होऊं लागली. १८५४ सालीं डच सरकारनें कित्येक झाडें जावामध्यें नेऊन लावलीं, तेथें त्यांचा प्रसार झाला. चालू महायुद्धापूर्वीपर्यंत कोयनेलच्या व्यापारांत डच लोकांसच प्राधान्य होतें. सिलोन व हिंदुस्थान येथें ब्रिटिश सरकारनेंहि सिंकोनाची लागवड केली. सिलोनमध्यें ती यशस्वी ठरली नाहीं, परंतु हिंदुस्थानांत मात्र तिला बरें यश आलें आहे.

### उडत्या बॉंबचा कारखाना

जर्मनीच्या लक्झेंबर्ग सरहद्दीजवळ उडत्या बॉंबचा एक कारखाना उघडकीस आला, त्याचें वर्णन मोठें उद्बोधक आहे. दररोज ५०० उडते बॉंब तयार करणारा तो कारखाना एका जुन्या लोखंडाच्या खाणीच्या दोन बोगद्यांत स्थापन केलेला आहे. डोंगराच्या कडेपासून आंत तीन मैल खोल काम चालतें व वहातुकीसाठी विजेच्या आगगाड्या आहेत. बोगदा बांधून काढण्यासाठी हजारो टन सिमेंट लागलें असलें पाहिजे. कारखान्यावर बॉंबहल्ल्यांचा कांहींहि परिणाम होऊं नये, अशा रीतीनें तो योजिलेला आहे व त्याची यंत्रसामुग्री व कार्यपद्धति मोठ्या आधुनिक कारखान्याच्या पद्धतीस साजेशीच आहे. कारखान्यांत काम करणारे सर्व कामगार रशियन, पोलिश, इटालियन असून त्यांवें २०० जर्मन यांत्रिक तज्ञांच्या देखरेखीखालीं काम चालतें. कामगारांना खाणींचे बाहेर कधींच जाऊं देत नाहींत, असें म्हणतात.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., १२८९, पुणें ५)

मागील पंधरा दिवसांत बाजारांत झालेली ववघट चमत्कारिक म्हणावी लागते. विशेषतः डिफर्डमध्यें ऋक्षांची (Bears) सरसहा कत्तल झाली आहे असें दिसतें. एक दलालही कमकुवत ठरल्याचें जाहीर झालें आहे. त्यावरून परवांचा डिफर्डमधला वृषभ-ऋक्ष समर प्रसंग बराच हातघाईचा ठरला असें म्हणावयास हरकत नाहीं. एका मारवाडी आसामीनें ४००० डिफर्डची उचल करून घेतली आहे असें म्हणतात. डिफर्डच्या मागोमाग गिरण्याही पुन्हा वर चढण्याच्या प्रयत्नांत होत्या पण वरच्या भावांत बरीच वेंचाण येत आहे. काल परवांच बाहेर पडलेल्या न्यू व्हिक्टोरियाच्या नफातोटयावरून गिरण्यांच्या कमी झालेल्या व होणाऱ्या नफ्यांची स्पष्ट कल्पना आतां येऊं लागली आहे. या गिरणीला मागील वर्षी ९० लाखांवर नफा झाला होता. यंदा तो ३८ लाखांवर इतका खालीं आला आहे. त्यापैकीं कर व जादा कर अनामतीकरता ३० लाख खर्ची पडले असून घसारा टाकून राहिलेल्या ५ लाखांतून ऑर्डिनरी शेअरला केवळ २ आणे व प्रेफरन्सला ६ टक्के सु. ५ आणे असें व्याज देण्यांत आलें. मागील वर्षी याच शेअर्संना अनुक्रमें ८ आणे व रु. १-२ वर व्याज मिळालें होतें. याच अहवालाबरोबर सोलापूरचाही अहवाल बाहेर पडला आहे. तेथेंही हाच प्रकार दिसतो. मागील वर्षी सोलापूरलाही ९० लाखांवर नफा होता तो यंदा ६४ लाख झाला आहे. कंपनीचे अध्यक्ष श्री. भाभा यांनीं सांगितलें कीं मागील वर्षी नफ्यापैकीं करभरणी करून राहणारे ६३/४ टक्के तेही यंदा व्याज वावयास उरत नाहींत इतकी करभरणी जाचक झाली आहे.

शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें सर अकबर हैदरी यांनीं म्हटल्याप्रमाणें कोठल्याच गिरण्यांना यंदा मागील वर्षीप्रमाणें अचाट नफे होणार नाहींत, कोठलीच गिरणी २० टक्क्यांवर पैसा सध्यां मिळवूं शकत नाहीं. तेव्हां गिरण्यांमध्यें तेजी झाली तरी तात्पुरती रहावी. तसेंच यापुढें गिरण्यांत पैसे गुंतवतांना ज्यांचे प्रमाणित नफे चांगले आहेत असें समजतें.—उदा० डांगे, सिंप्लेक्स, कोहिनूर, बी. आय. सी.—त्यांचेच शेअर्स घेणें चांगलें.

वरील इषारा देतांना हेंही निदर्शनास आणणें जरूर आहे कीं जरी नफे कमी झाले असले तरी बाजारभावांत वेडीवाकडी पडझड होण्याचें कारण नाहीं. इतर गिरण्यांत पैसे गुंतविणारांनीं घाबरण्याचें कारण नाहीं. कारणें रोजच वाढणारें चलन व उतरते व्याजांचे दर हे कोठल्यांही परिस्थितींत बाजार ढीलेंनें उचलून धरतील.

## महाराष्ट्र बँकेचे सर्व शेअर खपले

बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें १० लक्ष रुपयांचे २०,००० भाग प्रत्येकी ५ रुपये वाढीनें विक्रीस काढले व १५ डिसेंबर पर्यंत पहिल्या भागीदारांनीं घेऊन उरलेले भाग इतरांस तेवढ्याच वाढीनें देण्यांत येतील, असें बँकेनें जाहीर केलें. पहिल्या भागीदारांतच हे सर्व १० लक्ष रुपयांचे भाग खपले, असें समजतें. प्रीमियमचे १ लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत जाऊन बँकेच्या मजबुतींत आणखी भर पडून रिझर्व्ह फंडाचा आकडा भरदार होईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४१४ | राकेल—लॉर्ड वेव्हल आणि औद्योगिक प्रगति—ग्रेट-ब्रिटन—प्रवाशांचें आकर्षण! | |
| २ शेअर बाजार ... | ४१४ | ८ बँकांचा कायदा ... | ४१८ |
| ३ युद्धोत्तर हिंदी रेल्वे वहातुक | ४१५ | ९ शिक्षणाची प्रगति ... | ४१८ |
| ४ बृहन्महाराष्ट्र शु. सि. | ४१६ | १० हिरडा ... ... | ४१९ |
| ५ साखरेचा धंदा ... | ४१६ | ११ झेकोस्लोव्हाकिया व हिंदुस्थान ... ... | ४१९ |
| ६ तुमचें अन्न... ... | ४१६ | | |
| ७ स्फुट विचार... ... | ४१७ | | |
| रशिया आणि इराणमधील | | | |



# अर्थ

बुधवार, ता. २० डिसेंबर, १९४४


## युद्धोत्तर हिंदी रेल्वे वहातुक

### तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल चालू रहाणार ?

हिंदुस्थान सरकारचे युद्ध–वहातुक मंत्री, सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं आपल्या एका मुलाखतींत हिंदी रेल्वेजच्या युद्धोत्तर विस्तारासंबंधीं विचार व्यक्त केले. रेल्वे वहातुकींत सुधारणा करणें, हें मध्यवर्ती सरकारचें उद्दिष्ट असलें तरी शिक्षण, आरोग्य, इत्यादि बाबींवरहि सरकारला मोठा खर्च करावा लागेल आणि केवळ रेल्वेजवरच भरमसाट खर्च करून भागणार नाहीं, हें त्यांनीं स्पष्ट केलें. दहा-पंधरा वर्षांपूर्वी रेल्वेजच्या कारभारांत मोठी तूट येत असे आणि मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांतील वाढावा अथवा तूट रेल्वे बजेटावर अवलंबून राही. एकट्या रेल्वेजच्या उत्पन्न-खर्चावर सरकारचें सबंद आर्थिक धोरण हेलकावे खात रहाणें इष्ट नसल्याकारणानें, रेल्वेजची वाढ ही प्रमाणबद्ध होणें अगत्याचें आहे. सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं रेल्वेजच्या विस्ताराची ही मर्यादा मान्य करून व्यावहारिक पायावर रेल्वेवाढ करण्याचें आपलें धोरण स्पष्ट केलें हें योग्यच झालें.

रेल्वे व मोटर वहातुक ह्यांमधील स्पर्धा टाळून दोन्ही वहातुकींस वाव देण्याचें धोरण सरकारनें अंगीकारलें आहे. वहातुकीशीं प्रत्यक्ष संबंध येणाऱ्या प्रांतिक सरकारांचें मत प्रत्यक्ष रेल्वे व रस्ते आखण्याचे कामीं महत्त्वाचें मानलें जाईल. रेल्वेच्या फाट्यांमुळें मोटर वहातुक वाढावी व नव्या रस्त्यांच्या योजनेमुळें आगगाड्यांनाहि अधिक काम मिळावें, अशा दृष्टीनें आखणी केली जावयाची आहे. म्हणजे मोटर रस्त्यांच्या आखणींतहि रेल्वेजचा हितसंबंध आहे. मोटारींच्या वहातुकीवर सरकारचें नियंत्रण रहावें, अशीहि एक कल्पना आहे. म्हणजे आगगाड्या व मोटारी ह्यांची वहातुक एकमेकांस पोषक व सुसंघटित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. रशियांतील कार्यक्षम मोटर वहातुकीमुळेंच तो देश युद्धप्रसंगीं वहातुकीचा ताण सहन करूं शकला; हिंदुस्थानानें ह्या बाबतींत रशियाचें अनुकरण करण्यासारखें आहे असें सर बेंथॉल ह्यांनीं सांगितलें.

रेल्वेचे फाटे टाकण्याचें वेळापत्रक व कार्यक्रम ह्यांचीहि आपली कल्पना सर बेंथॉल ह्यांनीं स्पष्ट केली. जे रेल्वे-फाटे कालांतरानें फायदेशीर होतील किंवा जे देशाच्या आर्थिक सुधारणेसाठीं अत्यावश्यक आहेत, अशांची रचना करतांना इतर मोठ्या उद्योगधंद्यांतील मंदी वगैरेचा विचार करण्यांत आला पाहिजे, म्हणजे इतर ठिकाणीं बेकारी होईल त्यावेळीं रेल्वेचीं कामें मोठ्या प्रमाणावर चालू करावींत व प्रारंभीं मात्र जरा हलकींहलकीं कामें चालवावींत, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. रेल्वेज तयार करतांना सरकारनें फक्त रेल्वेपुरतेंच बघणें हें केव्हांहि इष्ट नाहीं; त्या योजनांचे आर्थिक परिणाम काय होतील ह्याचाहि विचार झाला पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें.

तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या युद्धोत्तर सुखसोयींची सगळीकडे जाहिरात चालू आहे; तथापि सर बेंथॉल ह्यांनीं त्याविषयीं काढलेले उद्गार फारसे आशादायक नाहींत. हिंदी जनतेचें दारिद्र्य लक्षांत घेतलें असतां, सोईपेक्षा स्वस्ताईच लोक पसंत करतात आणि ह्या दृष्टीनें सुखसोईवर करावयाच्या खर्चामुळें रेल्वेजना प्रत्यक्ष फायदा कांहींहि होणार नाहीं; चांगले डबे, स्नानाची व धुण्याची सोय, स्वच्छ व शीतल वेटिंग रूम्स, तिकिटें काढण्याची सोइस्कर व्यवस्था, इत्यादि गोष्टी घडवून आणण्याकरितां रेल्वेला भाडें वाढवावें लागलें, तर तें उतारूंना खपणार नाहीं व आम्हांला गर्दी असली तरी चालेल, गैरसोई खपतील, स्वच्छता नको, परंतु मेहेरबानी करून भाडें वाढवूं नका अशी उतारू गळ घालतील, हा सर बेंथॉल ह्यांचा युक्तिवाद समर्थनीय नाहीं. हिंदी जनतेस तो अपमानकारकहि वाटेल. तिसऱ्या वर्गाच्या दारिद्र्याचा व अडाणीपणाचा फायदा आज दीर्घकाल वरच्या वर्गाच्या उतारूंस मिळत आलेला आहे. तथापि, वरच्या वर्गाचा प्रवास जगांतील इतर कोणत्याहि देशांतील रेल्वे प्रवासाशीं तुलना करूं शकेल, अशी सुधारणा घडवून आणूं पहाणाऱ्या सर बेंथॉल ह्यांस तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या अगदी साध्या सोईहि करणें परवडणार नाहीं, अशी आतां भीति वाटूं लागली आहे. हिंदी लोकांच्याकडे पहाण्याच्या विशिष्ट दृष्टिकोनाचा हा परिणाम आहे. हिंदुस्थानाच्या पैशानें निर्माण करण्यांत येणाऱ्या सोईचा फायदा बहुसंख्य दरिद्री जनतेस मिळणार नसेल, तर त्या खर्चाचा उपयोग काय ? आजच्या रेल्वे प्रवासांतील गैरसोई व धोके हे पुढें दूर होण्याची आशा व सुखसोईचें आमीष सर बेंथॉल ह्यांनीं निराधार ठरवून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचा गैरसमज दूर केला आहे.

### हिंदी कपास

हिंदी कपाशीच्या उत्पादनाची किंमत १९४२–४३ मध्यें ६७ कोटि रुपये भरली; १९४३–४४ मधील उत्पादनाची किंमत ८९ कोटि झाली. ह्याचें कारण कपाशीच्या बाजारभावांत वाढ हें नसून, उत्पादनच अधिक झालें हें होय. १९४३–४४ मधील उत्पादन ५४,५०;००० गांठी झालें, १९४४–४५ मधील अंदाजी उत्पादन ४५,००,००० गांठी भरेल. एकूण ८०,५०,००० गांठी उपलब्ध होतील.

### स्टॉक एक्सचेंजला सुट्टी

ता. २३ डिसेंबर, १९४४ ते १ जानेवारी, १९४५ अखेर, स्टॉक एक्सचेंज बंद राहील.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

( वार्षिक सभा : ३१ डिसेंबर, १९४४ )

वरील कंपनीच्या हिशेबांतील गेल्या तीन वर्षांचे कांहीं तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| | १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर अखेर | | |
|---|---|---|---|
| | १९४१–४२ | १९४२–४३ | १९४३–४४ |
| वसूल भांडवल | ६,७५,३४१ | ७,९४,०१९ | ७,९८,१७० |
| रिझर्व्ह फंड | ... | — | १,२५,००० |
| वेल्फेअर फंड | ... | ... | ५०,००० |
| डि. ई. फंड | ३,७५९ | ३,९५८ | ७८,९५८ |
| इनकमटॅक्ससाठी तरतूद | १,८७,५०० | २,५२,५०० | २,५२,५०० |
| डिपॉझिटस व कर्जे ( बिगर तारण ) | १२,८७,५०५ | १८,९९,४०७ | २७,३८,६०२ |
| डिस्टिलरी | ... | १,४४,६४८ | ३,६९,२२४ |
| खतें, केमिकल्स, इ. शिल्लक माल | ४,५५,७५२ | ५,२८,८१४ | ९,१५,८०७ |
| उभी पिकें | ८,४७,१८० | ७,७३,५९८ | १४,१९,५३८ |
| शिल्लक साखर व गूळ | १,३११ | ६,३६,२८० | १२,६५,४९८ |
| साखर व गूळ विक्री | १९,३६,२१६ | २०,६७,९७७ | २१,५७,९९० |
| दिलेलें व्याज | ७२,८२६ | ८४,५९६ | १,६३,६०५ |
| मॅ. एजंटांचें नफ्यावरील कमिशन | ३२,९९७ | ५१,८१० | १७,४१० |
| निवळ नफा | ३,७७,००३ | ५,११,८९० | २,००,२२० |

वरील तक्त्यावरून, सिंडिकेटचे पैसे, डिस्टिलरी, शिल्लक, माल, शिल्लक साखर व गूळ इत्यादींत मोठ्या प्रमाणावर कसे अडकून पडले आहेत हें दिसून येईल. त्यामुळें, द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा आकडा गेल्या वर्षांच्या मानानें सुमारें दुप्पट होऊन तो १,६३,६०५ रुपये झाला.

मागच्या वर्षापेक्षा या वर्षी फायदा बराच कमी झाला त्याला अनेक कारणें झालीं. त्यांतील मुख्य कारणें प्रतिकूल हवामान, पाण्याचा अपुरा पुरवठा, उत्पन्न झालेल्या साखर व गूळ यांच्या विक्रीस झालेला कमाईचा उशीर, केमिकल्सचा अपुरा पुरवठा, गूळ उत्पादनावर व विक्रीवर सरकारी नियंत्रण, मजुरी व वहातूक यांचे गतवर्षीपेक्षा वाढलेले दर हीं आहेत.

स्पिरिटच्या कारखान्याचें कामही कल्पनेपेक्षा मंदगतीनें होत होतें याचे मुख्य कारण म्हणजे कारखान्याच्या इमारतीला लागणारें सामान सरकारी नियंत्रणाखालीं असल्यामुळें त्याचे परवाने निरनिराळ्या सरकारी खात्यांतून मंजूर होण्यास अंदाजापेक्षा फार जास्त वेळ लागला. यंत्रसामुग्रीचें काम मात्र बरेंच झालें आहे; व आतां नियंत्रित मालही किंमतीस मिळण्याची व्यवस्था होत आहे व या तऱ्हेनें जर प्रगति चालू राहिली तर स्पिरीट तयार करण्यास फारसा उशीर लागणार नाहीं अशी आशा आहे.

ता. ३० सप्टेंबर १९४४ रोजीं उभ्या असलेल्या उसाचें क्षेत्र २,००९ एकर २० गुंठे आहे. त्यापैकीं १,१९५ एकर ऊंस १९४४–४५ च्या हंगामांत गाळिताकरितां दिला जाईल, ८४ एकर नवीन लागणीकरितां बेणें म्हणून उपयोगांत आणली जाईल, आणि ७३० एकर २० गुंठे ( आडसाली व आडसाली-खोडवा ) सन १९४५–४६ चे हंगामाकरितां राखून ठेवण्यांत येईल. ४,५४४ एकर क्षेत्रांत धान्याची पिकें लाविली आहेत.

## हिंदुस्थानांतील साखरेचा धंदा

सुधारलेल्या जातींच्या उसाखालीं हिंदुस्थानांत आतां सुमारें ३५ लक्ष एकर जमीन आली आहे. इंडियन शुगर कमिटीनें चौकशी केली त्यावेळीं साखरेचा उतार ६% होता; आतां हें प्रमाण १०% वर गेलें आहे. कपास कापडाच्या गिरण्या सोडल्या तर उसाचा धंदा हाच सर्व हिंदी उद्योगधंद्यांत अग्रेसर झाला आहे. सुमारें १,००,००० कामगार आणि ३,००० पदवीधर व यांत्रिक तज्ज्ञ ह्यांची उपजीविका त्यावर अवलंबून आहे. ऊस लावणारे शेतकरी हे वेगळेच. हिंदी साखरेच्या धंद्यांत सुमारें ३३ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे व साखरेचें वार्षिक उत्पादन १३ लक्ष टनांवर आहे. ४४० रुपयांस एक टन ह्या हिशेबानें त्याचे ५७ कोटि रुपये होतात. १९१० आणि १९१४ ह्या दरम्यानचे काळांत हिंदुस्थानांत सालिना सरासरीनें ७,२३,९१५ टन साखरेची आयात होत असे. आतां हिंदुस्थान साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्ण झाला आहे. ३९ लक्ष टन गूळ निघतो, तो अर्थात् वेगळाच. साखरेपेक्षां गुळांत अन्नाचा भाग जास्त आहे. हिंदुस्थान सरकारनें हिंदी साखरेच्या धंद्यास दिलेली १५ वर्षांची संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९४६ रोजीं संपते. त्या नंतरच्या धोरणाचा विचार त्यावेळच्या एकंदर परिस्थितीचें परिशीलन करून सरकारास करावा लागेल.

---

### तुमचें अन्न*

हिंदुस्थानाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा लोकांस परिचय व्हावा, त्या ज्ञानाचे द्वारा लोकमत निर्माण व्हावें व त्यामुळें योग्य राष्ट्रीय धोरणास वळण लागून तें कृतींत उतरावें, ह्या हेतूनें टाटा सन्स लि. नें छोटेखानी पुस्तकांची माला गुंफण्याचें योजिलें आहे. सध्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न अन्नपुरवठ्याचा असल्याकारणानें त्या मालेंतील पहिलें पुस्तक " तुमचें अन्न " ह्या नांवाचें असून त्यांत अन्नाच्या प्रश्नाचें अगत्य व तो सोडविण्याचा मार्ग ह्यांचें वर्णन आलें आहे. पीपल्स फ्रॉ. फूड कौन्सिलचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. एम. आर. मसानी ह्यांनीं हें पुस्तक लिहिलें आहे. शक्य तितक्या लोकांच्या हातीं हें पुस्तक पडून त्याचा प्रसार व्हावा, ह्या दृष्टीनें पुस्तकाची मांडणी चटकदार, उठावदार व सुबोध अशीच केलेली आहे, विद्वत्ताप्रचुर ग्रंथाचें त्याचें स्वरूप नाहीं. पुस्तक लोकप्रिय झालें, तर त्याची प्रमुख हिंदी भाषांत रूपांतरें प्रसिद्ध करण्यांत येतील. खेडेगावांच्या सुधारणेचीं केंद्रें व इतर शैक्षणिक वगैरे संस्था ह्यांस हें पुस्तक विकत घेतां येणें शक्य न झाल्यास, तें त्यांस विनामूल्य देण्याचा टाटांचा विचार आहे. चित्रें, तक्ते, वगैरेंच्या सहाय्यानें पुस्तक आकर्षक करण्यांत आलें आहे. प्रस्तुत उपक्रमाबद्दल टाटांचें अभिनंदन केलें पाहिजे.

* पृ. सं. ८२. किं. १ रु. प्रकाशक : टाटा सन्स लि. करितां पद्मा पब्लिकेशन्स लि., मुंबई.

# स्फुट विचार

### रशिया आणि इराणमधील राकेल

इराणांतील राकेल तेलाच्या विहिरी प्रसिद्ध आहेत. त्यांमधून तेल काढून तें जगांतील देशांस विकण्यास जें भांडवल आणि औद्योगिक घटनाबळ लागतें तें इराणच्या लोकांत नसल्यानें तेथील सरकारनें हा धंदा चालवण्यास परकी राष्ट्रांतील धंदेवाल्यांस व सरकारांस योग्य मोबदला घेऊन परवाने दिले आहेत. ह्या धंद्यांत ब्रिटिश व अमेरिकन राष्ट्रांचा प्रामुख्यानें हात आहे. आपणहि ह्या उद्योगांत पडावें असें वाटून अलीकडे रशियानें इराणच्या सरकारकडे त्या देशाच्या उत्तर भागांत तेलाचा धंदा करण्यास रीतसर परवाना मिळावा अशी मागणी केली होती. पण ती इराणच्या सरकारनें साफ नाकारली आहे आणि ह्या धोरणानें जगांत आश्चर्य उत्पन्न केलें आहे. दुसऱ्या देशास परवानगी देण्यांत आली आहे तशी ती रशियास कां दिली जाऊं नये हा कुतूहलजन्य प्रश्न येथें उद्भवतो. बाहेरचे भांडवलवाले देशांत आले असतां त्यांचें राजकीय दडपण त्यांचे बरोबर येतें तें राष्ट्रीय भावनेच्या इराणी सरकारास नको आहे, हें त्याचें उत्तर आहे. रशियास तरी इराणी तेल कशास हवें आहे हा प्रश्नहि येथें अप्रस्तुत नाहीं. कारण रशियाच्या मालकीच्या स्वतःच्या प्रदेशांत तेलाचा भरपूर साठा व पुरवठा असून त्या राष्ट्रास ह्या महत्त्वाच्या पदार्थाची कधींच वाण भासलेली नाहीं, व पुढें भासण्याचीही नाहीं. तेलाच्या आंतरराष्ट्रीय धंद्यांत व व्यापारांत आपली भागीदारी असावी ह्या बुद्धीनें रशियन राज्यकर्त्यांनीं प्रस्तुत डाव टाकला असावा. युद्धोत्तर काळांत रशियास परदेशांतून जरूरीची यंत्रसामुग्री आयात करावी लागेल. तिचा मोबदला देण्याचें सामर्थ्य स्वतःमध्यें असावें म्हणूनहि रशिया इराणी तेलाच्या भानगडींत पडत आहे असा कांहींचा तर्क आहे. तें कांहींहि असो, इराणचा नकार हा रशियाच्या इभ्रतीचा प्रश्न आतां होऊन बसला आहे आणि रशियन राज्यकर्ते येन केन प्रकारेण स्वतःचें म्हणणें इराणवर लादल्यावांचून राहणार नाहींत. युद्ध चालू आहे तोंपर्यंत रशियाची मागणी आपणांस मान्य करतां येत नाहीं अशी सोडवणूक इराणी सरकारनें आपल्या नकारांत करून ठेवली आहे, पण तेवढ्यानें काम भागेल असें वाटत नाहीं. झारशाहींत उत्तर इराणमध्यें रशियाचें वर्चस्व स्थापण्यांत आलें होतें पण बोल्शेव्हिक राज्यकर्त्यांनीं ह्या बाबतचे सर्व हक्क सोडून दिले. त्यांचें पुनरुज्जीवन करून मध्यपूर्व एशियांत स्वतःचें राजकीय वजन प्रस्थापित करण्याचा सध्याच्या रशियन पुढाऱ्यांचा बेत दिसतो. हें केवळ अर्थकारण आहे, कीं राजकारणहि प्रस्तुत प्रश्नाच्या बुडाशीं आहे ?

---

### लॉर्ड वेव्हल आणि औद्योगिक प्रगति

कलकत्ता येथें युरोपिअन धंदेवाल्यांच्या असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या सभेंत भाषण करतांना व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, ह्यांनीं हिंदुस्थानांतील राजकीय, युद्धविषयक व आर्थिक परिस्थितीचें समालोचन केलें. सध्याची देशांतील राजकीय कोंडी फोडली जाण्याचे बाबतींत नवीन किंवा आशाजनक उपाय सुचवणें त्यांस शक्य झालें नाहीं. युद्ध चालू असे तोंपर्यंत हिंदुस्थानच्या राजकीय घटनेंत किंवा राज्यव्यवस्थेंत विशेष बदल करणें व्यावहारिक आहे असें त्यांस वाटत नाहीं. तथापि, युद्धपरिस्थिति हिंदी जनतेस जाचक होऊं नये आणि युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेची पूर्व तयारी योजनात्मक रीतीनें केली जावी ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकार योग्य प्रयत्न करीत असल्याचें व्हाइसरॉय ह्यांनीं सांगितलें. मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांचा प्रसार देशांत होणें आवश्यक असलें तरी शेतीच्या धंद्याची व शेतकरी वर्गाच्या हितसंबंधांची जोपासना दक्षतेनें केली जाण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें. अन्नपुरवठ्याची व्यवस्था आपल्या सरकारनें समाधानकारक रीतीनें चालवली असल्याची ग्वाही देऊन आपल्या मंत्रिमंडळाच्या कामगिरीबद्दल त्यांनीं धन्यता प्रकट केली. मालाचा पुरवठा आणि त्याच्या किंमती त्यांच्या नियंत्रणाबाबतच्या योजनांचा परिणाम समाधानकारक होत असल्याचें सांगून हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांचा विनियोग बेताबेतानें आणि सवड व संधी ह्यांस अनुसरून केला पाहिजे असें त्यांनीं सुचवलें. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या रस्ते, कालवे, सार्वजनिक आरोग्य इत्यादि विषयांच्या योजना प्रांतिक सरकारांनीं मध्यवर्ती सरकाराच्या सहकार्यानें आखणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांत परस्परांविषयीं विश्वास नांदला पाहिजे आणि ब्रिटिश व हिंदी कारखानदारांनीं परस्पर-सहकार्यानें हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीचा प्रश्न सोडवावा असा सल्ला लॉर्ड वेव्हल ह्यांनीं दिला.

---

### ग्रेट ब्रिटन—प्रवाशांचें आकर्षण ?

वरील नांवाचें एक चोपडें ट्रॅव्हल अँड इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटन ह्या संस्थेनें नुकतेंच प्रसिद्ध करून परदेशांतून प्रवासी आकर्षण करण्याचा प्रयत्न केल्यास ग्रेट ब्रिटनला सालिना १० कोटि पौंड प्राप्ति होऊं शकेल असें दाखवून दिलें आहे. १९२१ ते १९३८ ह्या काळांत प्रवासी आकर्षणाच्या धंद्यापासून ग्रेट ब्रिटनला सालिना सरासरीनें २ ते ३ कोटि पौंड मिळाले. म्हणजे, युद्धोत्तर काळांत हें उत्पन्न सुमारें चौपट करण्याचा प्रयत्न दिसतो. सरकारच्या सूचनेवरूनच वरील चोपडें तयार करण्यांत आलें आहे, ह्यावरून ब्रिटिश सरकारचें त्यांत असलेलें लक्ष स्पष्ट होतें. (१) परराष्ट्रांतून प्रवासी आकर्षण करण्याचें धोरण सरकारनें स्पष्टपणें अंगीकारून निर्गत व्यापारवाढीच्या प्रयत्नाप्रमाणेंच तिकडे लक्ष द्यावें, (२) ह्यासाठी सरकारनें एक स्वतंत्र संघटना निर्माण करून त्यासाठी लागणाऱ्या खर्चाची जबाबदारी उचलावी व (३) होटेल्सचे ह्या दृष्टीनें राष्ट्रीय महत्त्व लक्षांत घेऊन सरकारनें त्यांस सर्वतोपरी सहाय करावें अशा तीन सूचना ह्या चोपड्यांत करण्यांत आलेल्या आहेत. ग्रेट ब्रिटन हें प्रवाशांचें आकर्षण झालें म्हणजे इतर देशांतील लोकांप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकहि प्रवासासाठी व चैनीसाठी त्या देशाकडे ओढले जातील व त्यामुळें हिंदी पैसा ग्रेट ब्रिटनमध्यें वाढत्या प्रमाणावर खर्च होऊं लागेल. ब्रिटिश मालाची आयात हिंदुस्थानांत झाली म्हणजे त्याचे पैसे येथून त्या देशाकडे जावे लागतात. हिंदी प्रवासीच ग्रेट ब्रिटनमध्यें पैसे घेऊन गेले, म्हणजे ब्रिटिश मालाचा उठाव त्या देशांतच हिंदी पैशानें होऊन, मालाच्या किंमतीइतकें हिंदी देणें निर्माण होतें व मालाची प्रत्यक्ष निर्गत झाल्यासारखाच परिणाम घडून येतो. उपभोक्त्यांकडे माल न धाडतां मालाकडे उपभोक्ते ओढून नेणें, एवढाच दोहोंत फरक आहे. ब्रिटिश राहणीचा जवळून परिचय झाला, म्हणजे हिंदी प्रवाशांस हिंदुस्थानांत परत आल्यावरहि ब्रिटिश मालाची चटक लागणार व ब्रिटिश माल येथें मोठ्या प्रमाणावर खपूं लागण्यास सहाय होणार, हें ओघानेंच आलें. ग्रेट ब्रिटन हें प्रवाशांचें आकर्षण बनल्यामुळें, हिंदी प्रवाशांच्या खर्चाचा काय परिणाम होईल, हें उदाहरण म्हणून वर दाखविलें आहे.

## बँकांच्या नियंत्रणासाठीं स्वतंत्र कायदा

### आणखी कांहीं कलमांचा खुलासा

नव्या बँकिंग कायद्याचें नांव "बँकिंग कंपनीज ॲक्ट, १९४५" असें राहील. कोणत्या तारखेपासून तो अंमलांत येईल, हें हिंदुस्थान सरकार गॅझिटांत जाहीर करील. कंपनी कायदा व इतर कायदे ह्यांतील नियमांत प्रस्तुत कायद्याच्या नियमांनीं भर पडत आहे; बँकिंग कंपनीज ॲक्टांतील तरतुदी, तसें स्पष्ट म्हटलें असल्याविना, इतर कायद्यांतील तरतुदींची केवळ जागा घेणार नाहींत. सहकारी बँकाना हा कायदा लागू नाहीं. रिझर्व्ह बँकेनें तशी सूचना केल्यास, बँकिंग कंपनीज ॲक्टांतील सर्व किंवा कांहीं कलमांची अंमलबजावणी एका वेळेस ६० दिवसांपर्यंत, कांहीं किंवा सर्व बँकांच्या बाबतींत, त्याप्रमाणें गॅझिटांत जाहीर करून, तहकूब ठेवण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे. तातडीचे प्रसंगीं, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर किंवा त्यांच्या गैरहजरींत डेप्युटि गव्हर्नर वरील मध्यवर्ती सरकारचे अधिकार उपयोगांत आणूं शकतील.

### 'बँके'ची व्याख्या

मागणी येतांच परत केली पाहिजे, अशा ठेवी स्वीकारणें, म्हणजे 'बँकिंग,' अशी कायद्यांतील व्याख्या आहे. बँकांनीं 'बँकिंग' खेरीज इतरहि कोणत्या प्रकारचे व्यवहार करण्यास हरकत नाहीं, त्यांची यादी कायद्याच्या ६ व्या कलमांत दिलेली आहे. ह्या यादींत नसलेला कोणताहि व्यवहार करण्यास बँकांना बंदी आहे. बँकिंगचा व्यवहार करणाऱ्या प्रत्येक कंपनीच्या नांवांत "बँक," "बँकर" किंवा "बँकिंग" ह्यांपैकीं एक तरी शब्द आलाच पाहिजे. कोणत्याहि कंपनीच्या नांवांत वरीलपैकीं एकहि शब्द आला, तर ती बँकिंग कंपनीच समजली जाईल व त्या कंपनीस प्रस्तुत कायदा लागू होईल. मालाची खरेदी-विक्री, व्यापार, इत्यादींत कोणत्याहि बँकिंग कंपनीनें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें पडतां कामा नये. ह्यांत अर्थातच स्टॉक्स व शेअर्स ह्यांचा समावेश होत नाहीं. कित्येक प्रसंगीं कांहीं जिंदगी बँकांना आपल्या व्यवहारांतील येण्याच्या पोटीं स्वीकारावी लागते, परंतु वरील कलमांप्रमाणें त्यांबाबत व्यवहार करणें कायदेशीर नसतें. अशी मालमत्तेची, ती हातीं आल्यापासून सात वर्षांत, बँकांनीं विल्हेवाट लावली पाहिजे.

### व्यवस्थापक व त्यांचे करार

बँकांना खालील प्रकारचे व्यवस्थापक नेमतां येणार नाहींत:— (१) मॅनेजिंग एजंट, (२) ज्यांची प्राप्ती पूर्णतः अथवा अंशतः कमिशन किंवा कंपनीच्या नफ्याचा हिस्सा ह्यांवर अवलंबून असेल, असे व्यवस्थापक; (३) कंपनीच्या जिंदगीच्या मानानें ज्यांचें वेतन भरमसाट असेल, असे व्यवस्थापक किंवा (४) ज्यांचा कंपनीशीं व्यवस्थेबाबत पांच वर्षांपेक्षा दीर्घ मुदतीचा करार झालेला आहे, असे व्यवस्थापक. हे करार वाटेल तितक्या वेळा परंतु प्रत्येक प्रसंगीं पांच वर्षांच्या मुदतीचे, ह्याप्रमाणें वाढवितां येतील.

### अधिकृत, खपलेलें व वसूल भांडवल

बँकांच्या किमान भांडवलाविषयींच्या अटी "अर्था"च्या ता. ६ च्या अंकांत विस्तारानें दिलेल्या आहेत, त्यांचा पुनरुच्चार करण्याचें प्रयोजन नाहीं. बँकांच्या वसूल भांडवलाचें खपलेल्या व अधिकृत भांडवलाशीं काय प्रमाण असावें, हें खालील वाक्यांत सांगितलें आहे. "अधिकृत भांडवलाच्या निम्यापेक्षां कमी इतकें खपलेलें भांडवल असतां कामा नये व वसूल भांडवल खपलेल्या भांडवलाच्या निम्यापेक्षां कमी असतां कामा नये." ह्याचा अर्थ, अधिकृत भांडवलाचा आकडा वसूल भांडवलाच्या चौपटीपेक्षां मोठा कधींहि राहूं शकणार नाहीं. अधिकृत भांडवलाचे मोठे फुगीर आकडे व वसूल भांडवल हीं प्रमाणशीर नसल्यास, लोकांची दिशाभूल होते, ती टाळण्यासाठीं ही उपाययोजना आहे. १९४२ सालीं हिंदुस्थानांत एकूण ४८ बँका बुडाल्या अथवा गुंडाळण्यांत आल्या, त्यांचें अधिकृत भांडवल १ कोटि, ८२ लक्ष रुपये होतें, तर वसूल भांडवल पुरें १२ लक्ष रुपयेहि नव्हतें! बँकांच्या भांडवलांत फक्त ऑर्डिनरी शेअर्सच असले पाहिजेत; मात्र १ जुलै, १९४४ पूर्वी खपलेले प्रेफरन्स शेअर्स चालू रहातील. कंपनीच्या वसूल भांडवलाशीं भागीदाराच्या शेअरच्या रकमेचें जें प्रमाण पडेल, त्या प्रमाणांतच त्याला मताधिकार मिळावयाचा आहे.

## मुंबई प्रांतांतील शिक्षणाची प्रगति

| | १९४२–४३ | १९४३–४४ |
|---|---|---|
| शिक्षण संस्था | २२,५८२ | २२,१५४ |
| विद्यार्थी | १८,०९,७३४ | १८,४६,७४१ |
| शाळांतील मुलग्यांचें एकूण पुरुष लोकसंख्येशीं प्रमाण | १२·१८% | १२·३५% |
| शाळांतील मुलींचें एकूण स्त्री लोकसंख्येशीं प्रमाण | ४·९०% | ५·०९% |
| शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्च (रु.) | ४३६ लक्ष | ४८३ लक्ष |
| शिक्षणावरील अप्रत्यक्ष खर्च (रु.) | ५८ लक्ष | ६२ लक्ष |
| मॅट्रिकच्या परीक्षेचे विद्यार्थी | १७,८८९ | २०,८२३ |
| आर्ट्स व सायन्स कॉलेजांतील एकूण विद्यार्थी | १२,९९० | १६,७३२ |
| त्यांपैकीं विद्यार्थिनी | २,६१८ | ३,३०० |
| व्यावसायिक कॉलेजांतील एकूण विद्यार्थी | ४,३०९ | ५,४१७ |
| यांत्रिक व औद्योगिक शाळांतील विद्यार्थी | ४,५०७ | ५,६५८ |
| प्राथमिक शाळा | १९,०३७ | १९,४३७ |
| त्यांतील विद्यार्थी | १५,३६,२०० | १५,४६,२०० |
| प्राथमिक शिक्षणावर प्रत्यक्ष खर्च (रु.) | २२७ लक्ष | २५८ लक्ष |

मुंबईप्रांतांत एकूण २१,६५७ गांवें व खेडीं आहेत, त्यांपैकीं १३,३२३ ठिकाणीं शाळा आहेत. प्रत्येक ५·७ चौरस मैलास एक शाळा, असें १९४३–४४ मध्यें सरासरी प्रमाण पडलें.

शिक्षणावरील एकूण सुमारें साडेपांच कोटि रुपये खर्चाची वाटणी खालीं दिली आहेः—

| | १९४३–४४ | |
|---|---|---|
| | रकम | % |
| सरकारी | २,२२,३०,२५२ | ४०·५ |
| बोर्डें | ९४,२९,२३९ | १७·२ |
| फी | १,६४,३३,३९९ | ३०·० |
| इतर मार्ग | ६७,६०,७४२ | १२·३ |
| | ५,४८,५३,६३४ | १००·० |

## हिरडा

**( टॅनिंग अँड डायिंग सबस्टन्स )**

**ले:—श्री. के. जे. तवनप्पा, बेळगांव**

हिंदुस्थानांत आबालवृद्धांस हिरड्याचे वैद्यकीय उपयोग माहीत आहेत परंतु त्याची व्यापारी पैदास व महत्त्व हीं फारच थोड्यांच्या परिचयाचीं आहेत. हिरड्याची पैदास हिंदुस्थान-ब्रह्मदेशची मोनापली आहे. मजुरांच्या तुटवड्यामुळें ब्रह्मदेशांत माल गोळा करणें परवडत नाहीं. पूर्वापार आमच्या देशांत हिरड्याचा उपयोग कातडें कमावण्यासाठी व सुताचे रंगासाठी लोक करीत आले आहेत, परंतु अनलाईन कलर निघाल्यावर रंगासाठी तो कोणी वापरीत नसत. परंतु युद्धामुळें खाकी व ब्ल्यू ब्लॅयक सरकारी कापड ऑर्डर व इतर कामाचे रंगासाठी आमच्या देशी गिरण्यांनीं लाखों पोतीं हिरडा वापरून त्याचें देशी महत्त्व पटवून दिलें. " केमिस्ट्री अँड इंडस्ट्री " या ब्रिटिश मासिकानें ' एंपायर वॉर मटेरियल रिसोर्सेस ' नंबरमध्यें हिरड्याचें महत्त्व वर्णिलें आहे.

हिरडा हिंदुस्थानांत सर्वत्र जंगलांत पिकतो परंतु ब्रिटिश प्रांतापेक्षां संस्थानांत व रयतावी जमिनींत अधिक होतो. मुंबई इलाखा व संस्थानें, मध्यप्रांत व संस्थानें या भागांतच ७० टक्के पिकतो. शिवाय बिहार, ओरिसा, मद्रास, म्हैसूर येथें बाकी ३० टक्के होतो. एकंदरीत १॥ हंड्रेटवेटचे मापाचीं सुमारें १५ लाख पोतीं पिकतात. पैकीं ८-९ लाख पोतीं सालीना मुंबई व कलकत्ता बंदरांतून इंग्लंड, जर्मनी, हॉलंड, बेलजियम, फ्रान्स, अमेरिका, आस्ट्रेलिया, जपान वगैरे देशांस जातात. पैकीं इंग्लंड एकटे निम्मे घेते. मुंबई इलाख्यांत बेळगांव कारवार, सातारा, पुणें व नाशिक जिल्ह्यांत मिळून अंदाजें २ लाख पोतीं व कोल्हापूर आणि त्याच्या जहागिरि, आजरे तालुका, (इचलकरंजीपैकीं) बावडा, मलकापूर, भोर स्टेट, जंजिरा स्टेट मिळून ५ लाख पोतीं होतात. पैकीं बेळगांवचीं ८० हजार पोतीं. पिकांत निवडून नं. १ व नं. २ असें ग्रेड करितात. नं. १ ग्रेड ५० हजार पोतीं चालू १० वर्षांत सर्व मद्रास इलाख्यांत देशी कातडी कारखान्यांत खपतो. नं. २ चा माल कांहीं होलनटस व कांहीं क्रश करून सालपटें तेवढींच अमेरिका बहुधा, व बाकी जर्मनींत खपतो. पुणेंपैकीं जुन्नर व आंबेगांवचा माल आणि भोरपैकीं थोड्या भागाचा मिळून ५० हजार पोतीं पुणेंपैकीं भिमडी गांवचें नांवानें B, 1. क्वालिटी सदराखालीं मुंबईहून परदेशीं जातो. बाकी सर्व मिक्स करून राजापूर बंदरवरून R. १ R. २ क्वालिटी नांवानें मुंबईहून परदेशीं जातो. ग्रेडस " युनायटेड टॅनर्स फेडरेशन " लंडन या संस्थेनें R. 1, B. 1, J. 1 & tows in alls असे स्टँडर्ड नमुने ठरविले असून, त्याशिवाय नॉन फेडरेशन क्वालिटीचाही व्यापार होऊं शकतो. मध्यप्रांत पैकीं जबलपूर, मांडला, बालाघाट, रायपूर जिल्ह्यांत २ लाख पोतीं व तेथील, रेवा, बस्तार, कांकेड संस्थानांत मिळून ६ लाख पोतीं पिकतो. हा सर्व J. 1 & J. 2 सदराखालीं कलकत्त्याहून परदेशीं रवाना होतो. कांहींसा कानपूर, राजकोट, आग्रा वगैरे ठिकाणीं खपतो. शिवाय देशभर व्हिलेज टॅनिंगसाठी मोठ्या प्रमाणांत खपतो. याशिवाय हिरडा एक्सट्रॅक्टही कांहीं प्रमाणांत होतो. याच्या दोन फॅक्टऱ्यापैकीं एक खरगपूर व दुसरी राणीगंज येथें आहे. तिसरी आंबाघाट कोल्हापूर) येथें निघाली असून फॅक्टरी पूर्णत्वास पोंचली आहे; परंतु एक्सट्रॅक्ट लिक्विड फॉर्ममध्यें साधारण डांबरासारखा असतो तो भरणेस लाकडी पिपा मिळत नसलेमुळें काम अडलें आहे. कंपनीस सॉलिड फॉर्म मध्यें कच्चें मात शिजवून जसें उकडे तांदूळ तयार करतात त्याप्रमाणें तयार करून पोतींत भरतां येईल अशा प्रोसेसनें काम करून देणाऱ्या केमिस्टच्या शोधांत कंपनी असून त्यांना तो अद्याप मिळाला नाहीं. या पद्धतीनें सध्या खरगपुरास माल निघतो.

झाडें आपोआप वाढतात त्यामुळें मालकास रॉयल्टी चांगली व बिनाखर्च मिळते. माल जंगलांत गोळा करणेची मजुरी, गाडीभाडें, हमाली, ग्रेडिंगची मजुरी, खाली पोतीं अशा तऱ्हेनें मालाची ९५ टक्के किंमत लोकांस वाटली जाते शिवाय फक्त बेळगांवच्या हिरड्यावर रेल्वेस २ लाख रु. भाडें मिळतें.

आणखी एक गोष्ट आश्चर्याची म्हणजे आमचे रेल्वेचे रेट इतके विचित्र आहेत कीं बेळगांवचा हिरडा बंदरापर्यंत भाडें देऊन तेथून जहाजाचें भाडें देऊन C. I. F. लंडन, लिव्हरपूलला २॥· रु. स १ हंड्रेडवेट शांतता कालांत देण्यास परवडतें तेंच बेंगलोरच्या कारखान्यास तीच पडतर ३ रु. १ हें होते. तरी देशांत टॅनिंगचे कारखाने निघणेंसाठी आणि रेलवे दर देशी कातडी कारखान्यास पोषक ठरविणें अगत्याचें आहे.

---

### झेकोस्लोव्हाकिया व हिंदुस्थान

झेकोस्लोव्हाकियाची लोकसंख्या १३ कोटि असून त्याचें क्षेत्रफळ ५४,२४९ चौ. मैल आहे. युरोपांतील राष्ट्रांत क्षेत्रफळाचे दृष्टीनें त्याचा तेरावा व औद्योगिक सामर्थ्याच्या दृष्टीनें पांचवा अनुक्रम लागत होता. १९३० च्या शिरगणतीप्रमाणें, त्या देशांतील ३५% लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून होती, ३५% उद्योगधंद्यांत होते, १३% व्यापार, वहातुक वगैरेंत गुंतलेले होते व १७% नोकरी व इतर व्यवसाय यांत होते. इतर औद्योगिक राष्ट्रें व झेकोस्लोव्हाकिया यांत फरक असा, कीं ९२% औद्योगिक व व्यापारी उपक्रमांत प्रत्येक १ ते ५ माणसें कामावर होतीं, ५·९% मध्यें ६ ते १९ माणसें व २·२% मध्यें २० पेक्षा अधिक कामगार होते. युरोपांतील युद्ध संपत येत असल्याकारणानें, झेकोस्लोव्हाकियाचा हिंदुस्थानाशीं पूर्ववत् व्यापार कसा सुरू होईल याविषयीं चर्चा चालू आहे. झेकोस्लोव्हाकियाची मशिनरी या देशांत सुप्रसिद्धच आहे. विशेषतः हिंदी साखर कारखान्यांत झेक मशिनरी फार मोठ्या प्रमाणावर बसविण्यांत आलेली आहे. कांचसामान, कागद, बूट, इत्यादिंसाठीहि झेकोस्लोव्हाकिया प्रसिद्ध आहे. ' बाटा ' हें नांव सर्वंत्र हिंदुस्थानांत मशहूर आहे.

---

### ब्रिटिश निर्यात व्यापारास मोकळीक

जर्मनीच्या पराभवानंतर, ग्रेटब्रिटनला अमेरिकेकडून लेंड-उसनवार मिळणारी मदत निम्मानें कमी होणार आहे. युद्ध चालविण्यास आवश्यक अशाच बाबींची आयात चालू राहील. नागरिकांच्या जीवनोपयोगी वस्तूंची आयात बंद होईल. साहजीकच, पूर्वी ठरल्याप्रमाणें अशा वस्तूंची निर्यात सुरू करण्यास ग्रेट ब्रिटनला मोकळीक मिळेल. अमेरिकेंतून येणाऱ्या जीवनोपयोगी मालाची रोखीनें किंमत द्यावी लागेल.

### सुताचा अपुरा पुरवठा

मद्रास प्रांतांतील चितूर जिल्ह्यांत पुरेशा सुताचे अभावी १५,००० मागांपैकीं १०,००० माग बंद आहेत.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदवत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :
के. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७१

## सांडू हार्टिना

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## –राष्ट्रीय काटकसर–

युद्धकार्यांची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

## –गोल्डन कोको–

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors.)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.